## रे.दि.मु.नं.१५४/२०१८ मधील नि.२७ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ नियम १७ नुसार दावा दुरूस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. थोडक्यात वादी यांचे कथन असे की, प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी नि.२३ वर दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ७ नियम ११ प्रमाणे अर्ज देवून त्या अर्जात दि.०१/०४/१९५४ रोजीच्या खरेदीपत्राचा उल्लेख केलेला आहे. प्रतिवादींनी या खरेदीपत्राची मूळ प्रत न्यायालयात दाखल केलेली नाही. त्यानंतर वादींनी या खरेदीपत्राची प्रमाणित प्रत मिळविली. वादींचे असे म्हणणे आहे की, सदर खरेदीपत्र हे वादींवर बंधनकारक नाही. त्यामुळे त्या अनुषंगाने दाव्यात दुरूस्ती करणे आवश्यक झालेले आहे. वादीने मागणी केलेली नियोजित दुरूस्ती पाहता दि.०१/०४/१९५४ रोजीचे खरेदीपत्र वादींवर बंधनकारक नाही अशा स्वरूपाचे कथन त्यांना करावयाचे आहे असे दिसून येते.

३. वादींनी सदरचा दावा हा दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादींकडून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांच्या नावांची नोंद दावा मिळकतीच्या रेकॉर्ड सदरी बेकायदेशीररित्या लागलेली आहे असे वादींचे म्हणणे आहे. नियोजित दुरूस्तीद्वारे वादी दि.०१/०४/१९५४ रोजीचे प्रतिवादींच्या पूर्व हक्कदारांच्या नावे असलेले खरेदीखत हे मूलत: बेकायदेशीर आहे अशी दुरूस्ती दाव्यात मागत आहे. मूळ दाव्यात वादींनी प्रतिवादींची मालकी नाकारलेली आहे. अशा परिस्थितीत नियोजित दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपात बदल होणार नाही असे वाटते. जरी वादी हे दि.०१/०४/१९५४ रोजीच्या खरेदीपत्रास नियोजित दुरूस्तीद्वारे आव्हान देत आहेत असे दिसत असले तरी त्यांची मागणी मुदतीत आहे किंवा नाही ? हे दुरूस्ती अर्जावर

आदेश करतेवेळेस विचारात घेता येणार नाही.

४. प्रतिवादी क्र.१ ते ६ हे जरी या प्रकरणी हजर झालेले असले तरी त्यांनी कैफियत दाखल केलेली नाही. प्रकरण सुनावणीसाठी प्रलंबित नाही. अशा परिस्थितीत वरील कारणांचा विचार करता वादीस दावा दुरूस्तीस परवानगी देणे योग्य व न्यायोचित होईल असे वाटते. वादीस दाव्यात नियोजित दुरूस्ती करण्याची परवानगी दिल्यास वादी व प्रतिवादीमधील खरा वाद संपुष्टात येण्यास मदतच होईल. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे —

## आदेश

१) सदरचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२) वादीने अर्जातील विनंतीप्रमाणे दाव्यामध्ये १४ दिवसांचे आत दुरुस्ती करावी व त्याप्रमाणे दुरुस्तीची प्रत दाखल करावी.

Dipak Raghunath Mali

Digitally signed by Dipak Raghunath Mali
Date: 2020.02.03 17:32:20 +0530

**( डी. आर. माळी.)**

**दि.०३/०२/२०२०** **दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, वाई.**